ePaper
मी भजन केलं तरी ट्रोल होते, ट्रोलिंगची सवय झालीय: अमृता फडणवीस


|| वर्ष - 6 । अंक - 266 || UDYAM-MH-26-0158827 ||

# महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**आतील पानांत**

- "चैतन्यस्पर्श" ला उदंड प्रतिसाद!
- व्यसनमुक्त विद्यार्थी संकल्प!
- कुणबी जोडो अभियान


www.mahaenews.com | मंगळवार, दि.10 जानेवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# संतपीठ प्रवेश सुरू!

## व्यवस्थापनाची तयारी : सचिव संजय नाईकडे यांची माहिती




**।पिंपरी ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका संचलित चिखली जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ, पाटीलनगर टाळगाव कंपनी कायदा २०१३ च्या कलम ८ अंतर्गत स्थापन करण्यात आली आहे. त्यासाठी २०२३- २०२४ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.**

जगदगुरू संत तुकाराम महाराज संतपीठ अंतर्गत सुरू झालेले स्कूल अँड ज्युनियर कॉलेज हे महाराष्ट्र स्वयं अर्थसंहाय्यित शाळा (स्थापना व विनिमय) नियम २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर चालविण्यात येत असून शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करीता विद्यार्थ्यांसाठीचे प्रवेश अर्ज स्विकृतीस सुरुवात करण्यात आली आहे, अशी माहिती संतपीठाचे सचिव संजय नाईकडे यांनी दिली आहे.

जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, पाटीलनगर टाळगाव चिखली येथे शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये नर्सरी वर्गासाठी १६० विद्यार्थी, ज्युनियर के.जी. वर्गासाठी ९० विद्यार्थी, सिनियर के.जी वर्गासाठी ९० विद्यार्थी, इयत्ता पहिलीच्या वर्गासाठी ८८ विद्यार्थी, दुसरीच्या वर्गासाठी ८० विद्यार्थी, तिसरीच्या वर्गासाठी ४० विद्यार्थी, चौथीच्या वर्गासाठी ४० विद्यार्थी, पाचवीच्या वर्गासाठी ५२ विद्यार्थी, सहावीच्या वर्गासाठी ७ विद्यार्थी व सातवीच्या वर्गासाठी ४० विद्यार्थी संख्या निश्चित करण्यात आली आहे. ज्या वर्गाच्या क्षमतेपेक्षा प्रवेश अर्जाची मागणी जास्त असेल त्याच वर्गाचे प्रवेश अर्ज निश्चित करणेकामी सोडत पद्धत (लॉटरी) अवलंबिण्यात येईल.

### ... असे आहे शालेय शुल्क

संतपीठ शाळेत प्रवेश निश्चित विद्यार्थांसाठी पूर्व प्राथमिक वर्गांसाठी प्रती विद्यार्थी र.रु. २०,०००/- इयत्ता पहिली ते तिसरी वर्गाकरिता र.रु २७,०००/- इयत्ता चौथी ते पाचवी वर्गाकरिता ३२,०००/- ठरविण्यात आले होते. तसेच शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये इयत्ता सहावी व सातवीचे वर्ग सुरु करणेत येणार आहेत. त्यासाठी इयत्ता सहावीच्या विद्यार्थांसाठी र.रु ३२,०००/- व इयत्ता सातवीच्या विद्यार्थांसाठी र.रु ३५,०००/- शैक्षणिक शुल्क असेल तसेच शैक्षणिक साहित्य, वाहतूक खर्च वेगळा असेल, असेही संजय नाईकडे यांनी सांगितले.

### आरटीईनुसार आरक्षण लागू राहणार...

**केंद्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (CBSE) नियमानुसार अभ्यासक्रम, व्यवस्थापन, कार्यपद्धती, अध्ययन व अध्यापन प्रणाली इंग्रजी माध्यमातून असेल. त्यामध्ये मराठी, हिंदी व संस्कृत भाषेचा विषय म्हणून समावेश असेल. तसेच भारतीय संत साहित्य आध्यात्मिक व सांस्कृतिक अभ्यासक्रमाची जोड असेल. संतपीठ प्रवेश प्रक्रियेसाठी प्रथम चौकशी फॉर्मचे वाटप करण्यात येईल. फॉर्म जमा करण्याची अंतिम तारीख २५ जानेवारी २०२३ राहील. पात्र अर्जामधून जागांच्या उपलब्धतेनुसार सोडत पद्धतीने विद्यार्थांची निवड करण्यात येईल. तसेच आर.टी.ई च्या नियमानुसार नर्सरी वर्गासाठी आरक्षण लागू राहील.**

# यशासाठी ध्येयासक्ती, सातत्य व संघर्षाची तयारी हवी

## प्रा. नितीन बानगुडे पाटील : 'आयआयबी-इन्स्पायर' कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**।पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**



"डॉक्टर, इंजिनिअर होण्याचे ध्येय उराशी बाळगून तुम्ही अभ्यास करत आहात. अशा आव्हानात्मक क्षेत्रात यश मिळवायचे असेल, तर ध्येयासक्ती, अभ्यासातील सातत्य व संघर्षाची तयारी असायलाच हवी. इतर विचार सोडून ध्येयावर लक्ष केंद्रित केल्यास आभाळही ठेंगणे होईल," असे प्रतिपादन प्रेरणादायी वक्ते, इतिहास अभ्यासक प्रा. नितीन बानगुडे पाटील यांनी केले. 'आयआयबी इन्स्टिटयूट' सारखा मार्गदर्शक तुमच्यासोबत असल्यावर यश हमखास मिळणार, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

आयआयबी पुणे शाखेच्या वतीने 'आयआयबी-इन्स्पायर' कार्यक्रमात प्रा. नितीन बानगुडे पाटील हजारो विद्यार्थ्यांच्या समुदायाला मार्गदर्शन करत होते. साधारण चार हजार विद्यार्थी व पालकांनी याचा लाभ घेतला. मोरवाडी येथील मैदानावर झालेल्या या कार्यक्रमावेळी आमदार महेशदादा लांडगे, निवृत्त मुख्य न्यायाधीश एन. एस. लोहारे, कामगार नेते सचिन भैया लांडगे, मा. उपमहापौर तुषार भाऊ हिंगे, माजी उपमहापौर नानी घुले, माजी नगरसेवक समीर मासुळकर, माजी नगरसेवक दिनेश यादव, प्रथम श्रेणी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रकाश गुरुतवाड, पिंपरी चिंचवड लघु उद्योजक संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

अल्पावधीतच 'आयआयबी' महाराष्ट्राचा महाब्रँड म्हणून ओळख मिळाली असल्याचे सांगत पिंपरी चिंचवड पाठोपाठ आता पुण्यातही आयआयबीची द्वितीय शाखा सुरु झाली असून, पुणे शहरातही डॉक्टर होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना 'आयआयबी'चे मार्गदर्शन मिळणार असल्याचे प्रा. वाकोडे पाटील यांनी सांगितले.

### आयआयबी 'डॉक्टर बनवणारी फॅक्टरी'...

**प्रा. बानगुडे पाटील म्हणाले, "तुम्ही कोण आहात, यापेक्षा कोण होणार आहात, याचा विचार करा. कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि चांगले मार्गदर्शन घेण्यावर भर द्या. जितके जास्त कष्ट घ्याल, तितकेच मोठे यश मिळते. कुठलेही काम लहान, अवघड नसते. मनातून आपण खंबीर असलो की, सर्वकाही शक्य होते. मनापासून प्रयत्न कराल, तर नक्की यशस्वी व्हाल. मला डॉक्टर व्हायचे होते; पण योग्य मार्गदर्शन मिळाले नाही. आज 'आयआयबी इन्स्टिटयूट' सारखी 'डॉक्टर बनवणारी फॅक्टरी' तुम्हाला मिळाली आहे. त्यामुळे तुमची जिद्द आणि त्यांची साथ एकत्रित झाली, तर देशाला चांगले डॉक्टर मिळतील."**

# चैतन्यस्पर्श ला उदंड प्रतिसाद!

## लहू बालवडकर सोशल वेलफेअरचा लक्षवेधी कार्यक्रम

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

सुसंस्कृत पुण्याचा लोकप्रतिनिधी कसा असावा याचे एक मूर्तिमंत उदाहरण म्हणजे लहू बालवडकर. बाणेर, औंध,बालेवाडी, सुस, महाळुंगे भागात सामाजिक राजकीय क्षेत्रात कार्यरत असणारे हे युवा नेतृत्व. सामाजिक कार्यामध्ये सर्वात पुढे असणारे लहू बालवडकर हे अध्यात्मिक क्षेत्रात देखील चांगलेच सक्रीय असतात. नुकतेच लहू बालवडकर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लहू बालवडकर सोशल वेलफेअरकडून "चैतन्यस्पर्श" या अलौकिक सोहळ्याचे तसेच भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



चैतन्यस्पर्श या सोहळ्याच्या निमित्ताने पुणे जिल्ह्यातील हजारो भाविकांनी भारतातील १३ शक्तीपीठांमधील संत आणि देवतांच्या पादुकांच्या दर्शनाचा लाभ घेतला. अतिशय भक्तिमय वातावरणात हा सोहळा पार पडला. अंदाजे १८ ते २० हजार भाविकांनी यावेळी या अद्भुत सोहळ्याला हजेरी लावली तसेच जवळ पास पंधरा हजार भक्तीनी महाप्रसादाचा लाभ घेतला. 8 तास चाललेल्या या सोहळ्यानंतर संध्याकाळी आठ वाजण्याच्या सुमारास महाआरती झाली यावेळी प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. या सोहळ्याच्या निमित्ताने अवघा बालेवाडी परिसर भक्तिरसात नाहून निघाला. या सोहळ्याचे हे तिसरे वर्ष होते. महिला व पुरूष भजन स्पर्धेला ही लाभला उत्तम प्रतिसाद.

लहू बालवडकर सोशल वेलफेअरकडून महिला व पुरुष भव्य भजन स्पर्धेचे बाणेर बालेवाडी येथे आयोजन करण्यात आले होते. सुरूवातीच्या तीन दिवस या स्पर्धेची प्राथमिक फेरी मोठ्या उत्साहात पार पडली. त्यानंतर या प्राथमिक फेरीतून निवड झालेल्यांची महाअंतिम फेरी "चैतन्य स्पर्श" या कार्यक्रमात पार पडली. यामध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस "ताजुबाई" भजनी मंडळ,ताजे,मावळ आणि संगीतज्योती महिला भजनी मंडळ,हिंजवडी यांना देण्यात आले. यामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस "श्री. गणेश बाळ" भजनी मंडळ भोर आणि संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ,शेटेवाडी तळेगाव दाभाडे यांना देण्यात आले, तर तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस "श्री.हरी" भजनी मंडळ पिरंगुट आणि स्वरांजली भजनी मंडळ,मारुंजी यांना देण्यात आले .या स्पर्धेच्या परीक्षणाचे काम सुप्रसिध्द तबला वादक डॉ. राजेंद्र दुरकर आणि सुप्रसिध्द संगीतकार अंगत गायकवाड यांनी पाहिले. या महिला व पुरुष भव्य भजन स्पर्धेवेळी पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील,आमदार महेश लांडगे, दादा वेदकजी माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे मोहनबुवा रामदासी,किर्तनकार संतोष महाराज पायगुडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावत सर्व स्पर्धकांचा उत्साह वाढवला आणि लहू बालवडकर यांचे कौतुक केले. यावेळी बोलताना चंद्रकांत पाटील म्हणाले, आपल्या देशात अनंत काळापासून नांदत आलेल्या संस्कृतीतून व्यक्त होणाऱ्या ग्रामीण जीवनातील प्रतिमा, जनमाणसात रुजलेले लोकाचार आणि लोकरुढी याला रंजकतेने नटवित ही लोकसंस्कृती उभी राहते.

पुढे बोलताना ते म्हणाले, एकप्रकारे लोकजीवनाचे भावविश्व त्यात प्रतिबिंबित होते. भजन संस्कृती त्यातीलच एक भाग. या संस्कृतीचे आजही ग्रामीण भागात जतन आणि संवर्धनाचे सातत्याने काम होते. या संस्कृतीशी शहरी भागातील अनेकजण बांधिल आहेत. माझ्या कोथरूड मतदारसंघातील भाजपा नेते लहुजी बालवडकर यांनी या संस्कृतीचा लाभ व्हावा, यासाठी महिला पुरुष भजन स्पर्धेचे आयोजन केले आहे. आज या स्पर्धेस उपस्थिती राहून भजन सेवेचा आस्वाद घेतला. या स्पर्धेत हरिनामाच्या जयघोषात तल्लीन झालो.असं म्हणत त्यांनी बालवडकर यांचे कौतुक केले. दरम्यान, या सोहळ्याच्या निमित्ताने हजेरी लावणाऱ्या सर्व भाविकांचे लहू बालवडकर आभार मानले.

### "चैतन्यस्पर्श" सोहळा नेमका काय आहे?

"चैतन्यस्पर्श" हा भारतातील १३ शक्तीपीठांचा अद्भुत सोहळा असतो.दत्त महाराज संत ज्ञानेश्वर,स्वामी समर्थ,श्री नृसिंह सरस्वती,साई बाबा,गजानन महाराज,मच्छिंद्रनाथ महाराज,समर्थ रामदास स्वामी,टेंबे स्वामी महाराज,श्री शंकर महाराज, श्रीपाद स्वामी, गगनगिरी महाराज आदी संत मंडळी आणि देवतांच्या पादुकांचे यात एकत्र दर्शन घेता येते. यावेळी महाप्रसाद आणि एका महाआरतीचे देखील आयोजन करण्यात येते. यावेळी हजारो भाविक या सोहळ्यात दर्शन घेण्यासाठी येतात.

# श्री. एस. पी. देशमुख शिक्षण संस्थेच्या शिरपेचात रोवला गेला आणखीन एक तुरा...

## पंचायत समिती खेड, विज्ञान व गणित अध्यापक संघ खेड तालुका यांच्यावतीने संस्थेचा उत्कृष्ट संयोजक म्हणून सन्मान

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

पुणे जिल्हा परिषद पुणे तसेच पंचायत समिती खेड व विज्ञान गणित अध्यापक संघ खेड तालुका आयोजित तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन २०१९-२० निमित्त श्री एस पी देशमुख शिक्षण संस्थेच्या विद्यानिकेतन व विद्या व्हॅली या स्कूलला तालुक्याच्या विज्ञान प्रदर्शनासाठी यजमानपद देण्यात आलेलं होतं. या यजमान पदाची सर्वस्वी जबाबदारी खेड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी मा. संजय नायकडे यांच्या हस्ते देण्यात आली होती. या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उत्कृष्ट संयोजन विद्यानिकेतन व विद्या व्हॅली या स्कूलने संस्थेचे अध्यक्ष मा. श्री शामरावजी देशमुख, सचिव सौ.रोहिणीताई देशमुख व विज्ञान व गणित अध्यापक संघ यांच्या मार्गदर्शनाखाली सुंदर नियोजन केल्याबद्दल पुणे जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती खेड व विज्ञान व गणित अध्यापक संघ खेड तालुका यांच्यावतीने एस. पी. देशमुख शिक्षण संस्थेच्या स्कूलला उत्कृष्ट संयोजनाचे सन्मानपत्र व सन्मान चिन्हं देऊन गौरवण्यात आले. या सन्मान चिन्हाचा स्वीकार विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूल, चाकणचे प्राचार्य दीपक शिंदे सर यांनी केले.



### 2023-24 चे पुणे जिल्ह्याचे यजमानपद स्वीकारावं

तालुकास्तरीय संयोजन अतिशय उत्कृष्ट केल्यामुळे पंचायत समिती खेडचे गटशिक्षणाधिकारी मा. जीवन कोकणे तसेच गणित व विज्ञान अध्यापक संघ खेडचे अध्यक्ष वायकर सर व समन्वयक आदलिंगे सर यांच्यावतीने २०२३-२४ चे पुणे जिल्ह्याचे यजमानपद स्वीकारावं अशी घोषणा खेड तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या ग्लॅडिओलस इंग्लिश मीडियम स्कूल चाकण या विज्ञान प्रदर्शनाच्या कार्यक्रमांमध्ये आदलिंगे सर यांच्यावतीने करण्यात आली.

# दौंडज येथे प्राथमिक शाळेत भरला आठवडे बाजार



। वाल्हे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

शालेय अभ्यासक्रमाबरोबरच दैनंदिन जीवनातील व्यावहारिक ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे या उद्देशाने दौंडज (ता. पुरंदर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी आठवडे बाजार व खाऊगल्लीचे आयोजन केले होते. त्याला ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याचे शाळेच्या मुख्याध्यापिका मनीषा फरांदे यांनी सांगितले.

दौंडज (ता. पुरंदर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये शनिवारी (ता. ७)शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रमाअंतर्गत आठवडे बाजार व खाऊगल्लीचे आयोजन केले होते. 'भाजी घ्या भाजी...ताजी ताजी भाजी' अशा चिमुकल्यांच्या आरोळ्यांनी बाजारात रंगत आली होती. ग्राहकांनी देखील खरेदीसाठी चांगला प्रतिसाद दिला. ग्रामस्थ, महिलांनी आवर्जून या आठवडे बाजाराला भेट देऊन खरेदी केली. यादरम्यान विद्यार्थ्यांनी जवळपास वीस हजार रुपयांची कमाई केली. केंद्रप्रमुख सुरेश लांधी यांच्या हस्ते या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी विक्रम फाळके, पोलिस पाटील दिनेश जाधव, सचिन सातभाई, गणेश म्हेत्रे, जालिंदर घाटे, विजय फाळके, नितीन कदम, शरद जाधव, आदि उपस्थित होते.

# व्यसनमुक्त विद्यार्थी संकल्प!

## » पिंपरी-चिंचवड पोलिसांचा पुढाकार : शहरातील विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

**पिंपरी । महाईन्यूज ।**

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीत 18 पोलीस स्टेशन्स आहेत. या प्रत्येक पोलीस ठाण्याचा एका प्रतिनिधी अधिकरी असे एकूण 18 अधिकाऱ्यांना विश्रांतवाडी येथील मुक्तांगण केंद्रामध्ये व्यसन मुक्ती करण्यासाठीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. हे अधिकारी त्यांच्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शाळा व महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांमध्ये अंमली पदार्थ सेवन करू नये या संदर्भात जनजागृती करत आहेत.**



याविषयी अधिक माहिती देताना, अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सतिष पवार, म्हणाले की, पूर्वी अंमली पदार्थांचे सेवन फक्त श्रीमंत युवक करत असत. (PIMPRI NEWS) पण आता त्याचे सेवन सामान्य युवक सुद्धा करत आहेत. त्यामुळे अंमली पदार्थांचे सेवन वाढले असून त्यामुळे त्याचे दुष्परीणाम समाजात वाढले आहेत. हे दुष्परीणाम कमी करण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांच्या सेवनापासून दूर ठेवण्याची गरज आहे. नवीन पिढीला त्यांच्यापासून दूर ठेवायचे आहे. त्यामुळे याबाबत त्यांच्या मध्ये जनजागृती करण्याची गरज आहे.

उद्देशाने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तांनी 'रेजिंग डे' च्या अनुषंगाने अंमली पदार्थ विरोधी पथकाला अंमली पदार्थांचे युवा पिढीतील सेवन कमी करण्यासाठीचे उपाय योजना करण्यास सांगितले आहे. त्यामुळे प्रत्येक पोलीस ठाण्याचा एक प्रतिनिधी अधिकारी असे 18 पोलीस ठाण्यांच्या 18 अधिकाऱ्यांना एका दिवसाचे प्रशिक्षण मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्रामध्ये घेण्यात आले होते. त्यामध्ये माणसामध्ये व्यसन कसे सुरु होते, त्याचे दुष्परीणाम काय आणि व्यसनमुक्ती कशी करायची या बद्दल पावर पॉइंट प्रेझेंटेशन व व्याख्याना द्वारे माहिती देण्यात आली. त्यानंतर हे प्रशिक्षित अधिकारी त्यांच्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शाळा व महाविद्यालयांमध्ये अंमली पदार्थ सेवनाविरुद्ध जनजागृती करत आहेत. ही जनजागृती शाळेतील 8 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांसाठी व महाविद्यालयातील 11वी ते 12 वी च्या विद्यार्थ्यांसाठी करण्यात येत आहे. त्यासाठी संबंधित शाळा व महाविद्यालयांना पत्रे पाठवण्यात आली आहेत. त्यांच्या सोयीनुसार त्यांच्या आवारात 1.5 तासाचे सत्र घेण्यात येते. या सत्रामध्ये मुक्तांगण, स्माईल फाउंडेशन व विमल फाउंडेशन यांचे व्याख्याते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. माणसामध्ये व्यसन कसे सुरु होते? त्याचे दुष्परीणाम याबद्दल माहिती देण्यात येते.

### शहरातील 25 शाळा, महाविद्यालयांमध्ये जागृती...

**» या मोहिमेचा एक भाग म्हणून स्माईल फाउंडेशन, विमल फाउंडेशन व न्यू इंग्लिश स्कुल यांच्या वतीने शनिवारी 7 जानेवारी 2023 चिंचवड येथे रॅली काढण्यात आली. यामध्ये न्यू इंग्लिश स्कुल यांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. ह्या रॅली मधील विद्यार्थ्यांनी चिंचवडगावातील विविध भागात फिरून घोषणा देऊन जनजागृती केली. चिंचवड गावातील चाफेकर चौकामध्ये पथनाट्य सादर करून या रॅलीच्या समारोप करण्यात आला होता. आता पर्यंत 18 पोलीस ठाण्यांच्या हद्दीत एकूण 25 शाळा व महाविद्यालयांमध्ये अंमली पदार्थ सेवनाचे विरोधात विद्यार्थ्यांच्यामध्ये जनजागृती करण्यासाठी करण्यात आली आहे.**

---

# पिंपळे सौदागरच्या विकासात भाऊंचा मोलाचा वाटा!

## » शत्रुघ्न काटे यांच्या भावना : पिंपळे सौदागर, रहाटणीवासीयांकडून आदरांजली

**पिंपरी । महाईन्यूज ।**

पिंपळे सौदागर रहाटणी परिसरात दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या नेतृत्वाखाली, मार्गदर्शनाखाली बरीच विकासकामे मार्गी लागली. या परिसराचा कायापालट करण्यात आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी सिंहाचा वाटा उचलला. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच प्रभागात स्मार्ट सिटी प्रकल्प, उद्याने, मैदाने, रस्ते, साई चौक ग्रेड सेपरेटर आदिसारखी अनेक विकास कामे पूर्णत्वास आली असे मत माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी आदरांजली वाहताना व्यक्त केले.

दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी बासुरी बँक्वेट हॉल, हॉटेल गोविंद गार्डन, पिंपळे सौदागर याठिकाणी समस्त पिंपळे सौदागर रहाटणी रहिवासीयांच्या वतीने (रविवार दि.०८) रोजी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांचे मंगळवारी ३ जानेवारी रोजी दुःखद निधन झाले. त्यांची दीर्घ आजाराशी सुरु असलेली झुंज अखेर अयशस्वी ठरली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. या शोकसभेत उपस्थित नागरिकांनी दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या आठवणींचा उजाळा दिला.



### कधीही भरुन न येणारी पोकळी...

» पिंपरी चिंचवड शहराचा विकास करणारे, शहराचे ज्वलंत प्रश्न मांडून त्यासाठी लढणारे कणखर नेतृत्व कायमस्वरूपी आपल्यामधून निघून गेले. दिवंगत आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांनी आपल्या राजकीय जीवनात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये नगरसेवक, स्थायी समितीचे सभापती तसेच महापौरपदही भूषविले होते. तसेच विधानपरिषदेचे सदस्यही राहिले आणि सध्या ते विधानसभेचे विद्यमान आमदार म्हणून अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या जाण्याने राजकारणातील कधी हि न भरणारी अशी पोखळी निर्माण झाली आहे.

---




# पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या रिंगणात 'आप'

**पिंपरी** : आगामी पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेच्या निवडणुकीत 'आम आदमी पार्टी ' निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहे. मोफत पाणी, शिक्षण आणि वीज हे मुद्दे घेऊन निवडणूक लढणार असल्याची माहिती 'आप'चे महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष हरिभाऊ राठोड यांनी पत्रकार परिषदेत दिली. युतीत राहण्यापेक्षा आम्हाला स्वतंत्र लढणं आवडेल, आपापसात भांडण करणाऱ्यांसोबत आम्हाला जायचं नाही असं राठोड यांनी सांगितलं.

पंजाब आणि दिल्लीत सत्ताधारी असणाऱ्या आप पक्षाने आता राज्यात पिंपरी- चिंचवड महानगर पालिकेवरही लक्ष केंद्रित केले आहे. मोफत पाणी, वीज, दर्जेदार शिक्षण आणि आरोग्याचा मुद्दा घेऊन आप पक्ष निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असून आपलं नशीब अजमावणार आहे. पिंपरी-चिंचवडकरांना भेडसावणाऱ्या समस्यांचा आपने मुद्दा बनवला आहे. त्यात रेड झोन आणि शास्तीकराचा समावेश आहे. " एकेकाळी श्रीमंत महानगर पालिका म्हणून पिंपरी- चिंचवड महानगर पालिकेला ओळखलं जायचं, मग, मोफत आरोग्य सुविधा का दिल्या जात नाहीत " असा प्रश्न राठोड यांनी उपस्थित केला आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप, राष्ट्रवादी हे पक्ष बलाढ्य आहेत.

## संपादकीय »

# काळसुसंगत आहे तरी...

*देशात खासगी विद्यापीठे सुरू होऊन दशकाहून अधिक काळ लोटला असून, ती प्रामुख्याने उच्च मध्यमवर्गीयांना किंवा श्रीमंतांना परवडणारी आहेत.*

परदेशी विद्यापीठांना भारतात मुक्तद्वार देण्याचे धोरण काळसुसंगत म्हणता येईल. सध्या देशात ‘आयआयटी’, ‘आयआयएम’ यांसारख्या दर्जेदार संस्था किंवा जवाहरलाल नेहरू विद्यापीठ (जेएनयू), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (आयआयएस्सी) आदी ख्यातनाम विद्यापीठे यांपुरता मर्यादित असलेल्या गुणवत्तेच्या बेटांचा विस्तार यामुळे होईल, उच्च शिक्षणाची सुविधा वाढेल; तसेच परदेशांत जाऊन उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांना देशातच परदेशी विद्यापीठे उपलब्ध होऊ शकतील. महागडे उच्च शिक्षण घेण्याची क्षमता असणाऱ्यांना यामुळे अनेक पर्याय निर्माण होतील. देशात खासगी विद्यापीठे सुरू होऊन दशकाहून अधिक काळ लोटला असून, ती प्रामुख्याने उच्च मध्यमवर्गीयांना किंवा श्रीमंतांना परवडणारी आहेत. या विद्यापीठांना आता परदेशी विद्यापीठांशी स्पर्धा करावी लागेल. परदेशी विद्यापीठाशी स्पर्धा निर्माण झाल्याने खासगी विद्यापीठांची गुणवत्ता कदाचित वाढू शकेल आणि शुल्कही वाढू शकेल. खासगी विद्यापीठांशी स्पर्धा निर्माण झाल्याने देशात मोठ्या संख्येने असलेल्या सरकारी विद्यापीठांच्या पायाभूत सुविधांत, त्यांमधील प्राध्यापकांच्या संख्येत, नावीन्यपूर्ण उपक्रमांत विशेष फरक झाल्याचे दिसत नाही; तसेच त्यांच्यावरील संलग्न महाविद्यालयांचे आणि मोठ्या विद्यार्थिसंख्येचे ओझे कमी झालेले नाही. त्यामुळे परदेशी विद्यापीठांच्या आगमनानंतर सरकारी विद्यापीठांवर या अर्थाने परिणाम होण्याचा संभव कमी आहे. गेल्या २५ वर्षांत एकूणच शिक्षणाच्या वस्तूकरणाची सुरू झालेली प्रक्रिया आणखी गतिमान होण्याची आणि यामुळे शिक्षण महागण्याची शक्यता मात्र नाकारता येत नाही.परदेशी विद्यापीठांच्या परवानगी देण्याच्या धोरणाचा मसुदा सादर करताना ‘यूजीसी’चे अध्यक्ष एम. जगदेश कुमार यांनी उच्च शिक्षणासाठी परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची सादर केलेली संख्या महत्त्वाची आहे. गेल्या वर्षी (२०२२) सुमारे साडेचार लाख भारतीय विद्यार्थी परदेशात गेले. त्यांचा एकत्रित खर्च तीस अब्ज डॉलरच्या घरात असल्याचा अंदाज आहे.

# लोकशाही ‘लोकांची’ होण्यासाठी...






कालपरत्वे वैयक्तिक स्वार्थ आणि काही अंशी विचारसरणीचा अतिरेकी प्रभाव या दोन प्रमुख बाबींमुळे लोकशाही क्षीण होत चालली आहे, हे सत्य नाकारून चालणार नाही. वैयक्तिक स्वार्थ हा प्रामुख्याने अर्थार्जनाच्या वाटेने जाणारा असल्याने लोकशाही संस्था या भांडवलशाहीच्या बटीक बनत चालल्या आहेत. अर्थशास्त्रासाठीचे नोबेल पारितोषिक विजेते जोसेफ स्टिग्लीट्झ सध्याच्या लोकशाहीची सुधारित व्याख्या करताना म्हणतात, सध्याच्या काळात लोकशाही म्हणजे १ टक्का लोकांचे, १ टक्का लोकांकडून चालवले जाणारे आणि १ टक्का लोकांसाठी चालवले जाणारे राज्य. १ टक्का हा धनवान लोकांचा समूह अभिप्रेत आहे.

सन २०१८ मध्ये राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीतील धन, बाहुबलता व प्रसारमाध्यमे यांचा गैरवापर कसा थांबवता किंवा कमी करता येईल, यासाठी एक कार्यशाळा मुंबईमध्ये घेतली होती. मी त्या कार्यशाळेत जोपर्यंत संपूर्ण लोकशाहीला भांडवलशाहीच्या विळख्यातून बाहेर काढायचा प्रयत्न होत नाही तोपर्यंत निवडणुकांमध्ये धनसंपत्तीचा गैरवापर कमी करण्याचे प्रयत्न म्हणजे सूर्याला दिवा दाखवण्यासारखे आहे हे स्पष्ट केले. अशा परिस्थितीत निवडणूक आयोगाने त्रयस्थ व स्वायत्त संस्था म्हणून देशाला नवी दिशा द्यावी असे सुचविले.

लोकशाहीचे आरोग्य सुदृढ करावयाचे झाले तर त्यासाठी काय केले पाहिजे, हा मुद्दा देशाच्या आणि जगाच्या अजेंड्यावर आला पाहिजे. तसा तो बऱ्यापैकी दुर्लक्षिला गेला आहे हे मान्य करावे लागेल. आज जगापुढे अगणित समस्या आ वासून उभ्या असल्या, तरी त्या सर्वांवर समर्पक तोडगे काढून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी जी सक्षम व्यवस्था जागतिक, तसेच देश पातळीवर असावी लागते, ती कमकुवत असेल तर मग सर्वच भरकटत जाईल यात शंका नाही. जग लोकशाही व्यवस्थेकडे गेले तरच समस्या सुटण्याचा मार्ग दिसून येतो.

लोकशाहीचे मूल्यमापन करणाऱ्या अनेक संस्था आहेत, त्यापैकी व्ही-डेम इन्स्टिटयूटने जागतिक पातळीवर सर्वत्र लोकशाही मूल्यांची अधोगती होत असल्याचे अधोरेखित केले आहे. ‘द इकॉनॉमिक्स’ या लंडनस्थित प्रथितयश नियतकालिकाचे इकॉनॉमिक्स इंटेलिजन्स युनिट २००६ पासून दरवर्षी जागतिक लोकशाहीचे मूल्यमापन करून लोकशाही सुदृढतेचा निर्देशांक अभ्यासपूर्ण प्रक्रियेतून जाहीर करते. २०२१ च्या त्यांच्या अभ्यासानुसार जगातील फक्त ६.४ टक्के लोक हे पूर्ण लोकशाही व्यवस्थेत असून ३९.३ टक्के लोकसंख्या दोषपूर्ण लोकशाही, तर १७.२ टक्के लोकसंख्या मिश्र लोकशाही व ३७.१ टक्के लोकसंख्या ही हुकूमशाही व्यवस्थेमध्ये आजही वावरत आहे. अमेरिका व भारत हे दोषपूर्ण लोकशाही व्यवस्थेत असल्याचा त्यांचा निष्कर्ष आहे. त्यांचे आणखी एक निरीक्षण असेही आहे की, लोकशाही उत्तरोत्तर क्षीण होऊ लागली आहे.

जगातील लोकशाही भक्कम करावयाची झाल्यास जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था म्हणून भारताने पुढाकार घेणे आवश्यक ठरते. अर्थात त्यासाठी भारताने प्रथम स्वत:पासून सुरुवात केली पाहिजे. त्याबाबत काय करावे लागेल यावर मला जे वाटते ते पुढे नमूद करीत आहे. प्रथमत: लोकप्रतिनिधी निवडणे ही मतदारांची इच्छा असते. लोकशाही मूल्ये व संविधानाच्या संरचनेप्रमाणे राजकीय पक्ष त्यामानाने गौण असतो.

# सरकारी ऊर्जेपुढे आव्हानांचा डोंगर

**मक्तेदारीमय वातावरणात एका खासगी कंपनीने महावितरणच्या क्षेत्रात समांतर वीजपरवान्यासाठी अर्ज केल्याने मागील आठवड्यात ऊर्जा क्षेत्र ढवळून निघाले.**

सरकारी क्षेत्रात ‘खासगीकरण’ हा शब्द नेहमीच अत्यंत संवेदनशील असतो. त्यातून देशातील काही ‘ठरावीक’ उद्योग समूहांनी सरकारी मक्तेदारी असलेल्या क्षेत्रात पाऊल ठेवले की, ही संवेदनशीलता आक्रमक रूप घेते. तेच ठाणे, नवी मुंबई या परिसरातील वीजवितरण समांतर परवान्याबाबत झाले. बलाढ्य उद्योग समूहाने येथे समांतर परवान्यासाठी अर्ज केला आणि सारे क्षेत्र हादरले. या अर्जाविरुद्ध कसोशीने बाजू मांडण्याचे आश्वासन सरकारदरबारी मिळाले असले तरी, समोरील स्पर्धा ही महावितरणसाठी नक्कीच सोपी नाही.

महावितरण ही सरकारी वीजकंपनी ८० टक्क्यांहून अधिक भागांत व जवळपास ५० टक्क्यांहून अधिक ग्राहकांना अनेक दशकांपासून वीजवितरण करते. पण विजेची नासाडी ही या कंपनीच्या प्रणालीतील सर्वांत मोठी त्रुटी आहे. महावितरणची वार्षिक वीजमागणी ही १.१८ लाख दशलक्ष युनिटदरम्यान आहे. मात्र त्यासाठी कंपनीला सुमारे १.३८ लाख



दशलक्ष युनिटची वीज खरेदी करावी लागते. प्रत्यक्ष वीजखरेदी व वीजवितरण यांच्यातील या तफावतीचा कंपनीच्या ताळेबंदाला मोठा फटका बसतो.

दुसरा भाग येतो, तो कृषी क्षेत्राचा. सरकारी कंपनी या नात्याने कृषी क्षेत्राला दीड रुपया प्रतियुनिट दराने वीजवितरण करणे, हे महावितरणला बंधनकारक आहे. कंपनीची सरासरी वीजखरेदी ही ६ ते ७ रुपये प्रतियुनिट असताना जवळपास ३० हजार दशलक्ष युनिट वीज फक्त दीड रुपयाने विक्री करावी लागते. यामधील तफावत कंपनी ३०० युनिटहून अधिक वीज वापर असलेल्या, तसेच व्यावसायिक व औद्योगिक श्रेणीतील ग्राहकांना अधिक दराने वीजविक्री करून ‘क्रॉस सबसिडी’च्या रूपात वसूल करते. दुसरीकडे कृषी क्षेत्राला जी अत्यल्प दराने वीजविक्री होते, त्यातील निम्मे देयकदेखील वसूल होत नाही. याचाही कंपनीच्या ताळेबंदावर भार येतो.

महावितरणच्या अडचणीचा आणखी एक मुद्दा ‘नेट मीटरिंग’चा आहे. महावितरणचे मीटर असतानादेखील सौरपॅनलद्वारे वीज घेणे व अतिरिक्त वीज महावितरणच्या ग्रीडमध्ये सोडून त्या बदल्यात मूळ देयकांत सवलत मिळविण्याची मुभा ग्राहकांना आहे. या योजनेमुळे मासिक ३०० युनिटहून अधिक वापर असलेल्या महावितरणच्या लाखो ग्राहकांचा मागील पाच वर्षांतील वीजवापर ३०० युनिटच्या खाली आला आहे. परिणामी कंपनीला त्यांच्याकडून मिळणारी ‘क्रॉस सबसिडी’ मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. अशा सर्व विविध संकटपूर्ण वातावरणात जिथे मक्तेदारीमय वातावरण आहे, अन्य कोणीही वितरक नाही, त्या क्षेत्रात समांतर वीजवितरक येणार असल्यास कंपनीला धक्का बसणारच.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कुणबी जोडो अभियान!

## रायगडमध्ये एकटवला कुणबी समाज : महाड तालुक्यात हजारोंच्या संख्येने समाजबांधव एकत्र





### हजारोंच्या संख्येने अभियानात सहभागी

» कुणबी समाजोन्नती संघाचे अध्यक्ष भूषण बरे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली, कुणबी राजकीय संघटन समिती अध्यक्ष अशोक वालम यांच्या प्रयत्नातून रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे, पालघर, मुंबई नवी मुंबई, मुंबई उपनगर क्षेत्रात कुणबी जोडो अभियान राबविले जात आहे. महाड-पोलादपूर तालुकाध्यक्ष अनंत गवळकर यांच्या पुढाकाराने 8 जानेवारी रोजी तालुक्यातील 9 गट आणि हजारोंच्या संख्येने कुणबी समाज बांधव-भगिनी अभियानात सहभागी झाले. कुणबी समाजोन्नती मंडळ महाड-पोलादपूर मध्यवर्ती अध्यक्ष प्रदीप लोखंडे, सरचिटणीस प्रकाश तरळ, कोषाध्यक्ष संभाजी काजरेकर, कुणबी युवा संघाचे सहसचिव मिलिंद चिबडे आदींनी या अभियानाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

। पोलादपूर। महाईन्यूज ।

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर 75 वर्षे होऊनही कोकणातील कुणबी समाज उपेक्षितच आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित मागण्यांच्या पाठपुराव्यासाठी तसेच समाज संघटन मजबूत करण्याच्या दृष्टीने आता कुणबी जोडो अभियानाला सुरुवात झाली आहे. कुणबी जोडो अभियानातून रायगडमध्ये कुणबी समाज एकटवला आहे. महाड तालुक्यात हजारोंच्या संख्येने समाजबांधव एकत्र आले.

डिसेंबर 2022 मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातून कोकणातील कुणबी जोडो अभियानाची सुरुवात झाली आहे. मुंबईतील कुणबी समाजोन्नती संघ या शतकोत्तरी वाटचाल केलेल्या मातृसंस्थेच्या वतीने, 8 जानेवारी रोजी महाड पोलादपूर तालुक्यातील बारा ते पंधरा हजार कुणबी समाजबांधव एकत्र आले होते. महाड तालुक्यातील पाचाड गावी राजमाता जिजाऊ यांच्या पुतळ्यास अभिवादन करून रॅली काढली गेली. लोकनेते माजी आमदार स्व. शांताराम फिलसे यांच्या जन्मभूमी चिंभावे गावी तालुकास्तरीय कुणबी जोडो अभियान रॅलीचा समारोप झाला.

# शिंदे गटाच्या 16 आमदारांबाबत आज सर्वोच्च न्यायालयात होणार सुनावणी?

## शिवसेनेचे निवडणूक चिन्ह : धनुष्यबाण दोनही गटापैकी कोणाला मिळणार

। मुंबई । महाईन्यूज ।

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर आणि शिंदे गटातील अपात्र 16 आमदारांबाबत मंगळवारी (10 जानेवारी) सुनावणी होणार आहे. त्यानुसार, सर्वोच्च न्यायालयात 16 आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात उद्या सुनावणी होणार आहे. तर शिवसेनेचे निवडणूक चिन्हे धनुष्यबाण दोनही गटापैकी कोणाला मिळणार या संदर्भात निवडणूक आयोगात सुनावणी होणार आहे.

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर आणि शिंदे गटातील अपात्र 16 आमदारांबाबत मंगळवारी (10 जानेवारी) सुनावणी होणार आहे. त्यानुसार, सर्वोच्च न्यायालयात 16 आमदारांच्या अपात्रतेसंदर्भात उद्या सुनावणी होणार आहे. तर शिवसेनेचे निवडणूक चिन्हे धनुष्यबाण दोनही गटापैकी कोणाला मिळणार या संदर्भात निवडणूक आयोगात सुनावणी होणार आहे. विशेष म्हणजे पहिल्यांदाच देशाच्या निवडणूक आयोगात प्रत्यक्ष सुनावणी पार पडणार आहे.



### या 16 आमदारांना नोटीस

» राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अब्दुल सत्तार, तानाजी सावंत, यामिनी जाधव, संदीपान भुमरे, भरत गोगावले. संजय शिरसाट, लता सोनावणे, प्रकाश सुर्वे, बालाजी किणीकर, बालाजी कल्याणकर, अनिल बाबर, महेश शिंदे, संजय रायमुलकर, रमेश बोराने आणि चिमणराव पाटील या 16 आमदारांना ही नोटीस पाठवण्यात आली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी 10:30 वाजताच्या सुमारास सुप्रीम कोर्टामध्ये महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाबाबत सुनावणी होणार आहे. दरम्यान, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी गुवाहाटीला गेलेल्या 16 आमदारांना तुमच्यावर कारवाई का करू नये? याबाबत 48 तासात उत्तर द्यायची नोटीस पाठवली होती. त्यामुळे या सुनावणीत 16 आमदारांना विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी पाठवलेल्या नोटीसबाबत सुप्रीम कोर्टात काय निर्णय होणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

ठाकरे गट आणि शिंदे गट या दोन्ही गटाने जे कागदपत्र सादर केले आहेत, त्यावर शंका घेणारे अर्ज सादर करण्यात आले आहेत. त्यावर उद्या अगोदर सुनावणी होणार आहे. त्यानंतर मूळ प्रकरणावर सुनावणी घ्यावी

# सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी

## चार सदस्यीय समिती नियुक्त

। सांगली । महाईन्यूज ।

जिल्हा मध्यवर्ती बँकेतील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी चार सदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे. ३१ जानेवारी पर्यंत अहवाल देण्याचे आदेश सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी सोमवारी दिले. जिल्हा बँकेत इमारत नूतनीकरण, फर्निचर, एटीएम खरेदी, शाखा नूतनीकरण आदी अनावश्यक बाबींवर सुमारे ३० ते ४० कोटींचा खर्च करण्यात आला असल्याचा आक्षेप विद्यमान अध्यक्ष आमदार मानसिंगराव नाईक यांच्यासह तत्कालिन ९ संचालकांनी सहकार विभागाकडे लेखी पत्राद्वारे घेतला होता.

तसेच स्वतंत्र भारत पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनिल फराटे यांनीही याबाबत तक्रार केली होती. यावर सहकार विभागाने चौकशी समिती नियुक्त केली होती. मात्र, चौकशी समिती नियुक्तीला २४ तास उलटण्यापूर्वीच तत्कालिन



महाविकास आघाडी सरकारने स्थगिती दिली.

दरम्यान, शिंदे सरकारने ३१ डिसेंबर रोजी स्थगिती आदेश मागे घेत चौकशीचे आदेश दिले. यानुसार सहकार आयुक्त कवडे यांनी कोल्हापूरच्या सहनिबंधकांना चार सदस्यीस समिती नियुक्त करण्याचे आदेश आज दिले.

या समितीमध्ये शिथल चोथे, संजय पाटील, अनिल पैलवान आणि रघुनाथ भोसले हे चार सदस्य असून या समितीने आक्षेपाबाबत मुद्दयांची चौकशी करून अहवाल पूरक कागदपत्रांसह व कार्यवाही सूचक मुद्दयासह 31 जानेवारीपर्यंत सादर करावा असे आदेश विभागीय सहनिबंधकांना आज दिले.

# एकनाथ शिंदें-देवेंद्र फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार होणारच नाही!

## 2024 नंतरच आपल्या मंत्रिमंडळाचा विस्तार होईल ;विधान बच्चू कडू यांचे सूचक वक्तव्य

। मुंबई। महाईन्यूज ।

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकार कोसळलं आहे. यानंतर महाराष्ट्रात शिंदे-फडणवीस सरकार अस्तित्वात आलं. हे सरकार स्थापन होऊन सहा महिन्याहून अधिक कालावधी लोटला आहे. तरीही या सरकारचा अद्याप मंत्रीमंडळ विस्तार झाला नाही. सत्ताधारी पक्षातील नेत्यांकडून दररोज मंत्रीमंडळ विस्ताराच्या नवनवीन तारखा दिल्या जात आहेत.



अशी एकंदरीत राजकीय स्थिती असताना शिंदे-फडणवीस सरकारला पाठिंबा देणारे प्रहार संघटनेचे आमदार बच्चू कडू यांनी मोठं विधान केलं आहे. शिंदे फडणवीस सरकारच्या या कार्यकालात मंत्रीमंडळ विस्तार होणारच नाही, अशा प्रकारचं सूचक विधान बच्चू कडू यांनी केलं. आपण जेव्हा सत्ताधारी पक्षातील आमदारांशी बोलत असतो, तेव्हा २०२४ नंतरच मंत्रीमंडळ विस्तार होईल, असं सांगत असतो, असंही बच्चू कडू म्हणाले..दिव्यांग मंत्रालयाचं मंत्रीपद तुमच्याकडे कधी येणार आहे? असं विचारलं असता बच्चू कडू म्हणाले, “मला वाटतं, हा प्रश्न तुम्ही एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीसांना विचारायला हवा. आम्ही सर्व आमदार जेव्हा एकत्र बसत असतो. तेव्हा मी त्यांना सांगत असतो की, २०२४ नंतरच आपल्या मंत्रिमंडळाचा विस्तार होईल,” असं सूचक विधान बच्चू कडूंनी केलं.

‘मंत्रिमंडळाचा लवकरच विस्तार होईल’ या मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या विधानाबाबत विचारलं असता बच्चू कडू मिश्किलपणे म्हणाले की, “एवढ्यात मंत्रीमंडळ विस्तार झाला तर आम्ही तुम्हाला पेढे भरवू.... पण आम्ही सगळ्या आमदारांनी आता आमची मानसिकता तयार करून ठेवली आहे. मंत्रीमंडळ विस्तारात तुम्ही डोकं नका लावू, काहीतरी काम करा,” असंही बच्चू कडू म्हणाले.

### मंत्रिमंडळाचा लवकरच विस्तार होईल’

**एकंदरीत राजकीय स्थिती असताना शिंदे-फडणवीस सरकारला पाठिंबा देणारे प्रहार संघटनेचे आमदार बच्चू कडू यांनी मोठं विधान केलं आहे. शिंदे फडणवीस सरकारच्या या कार्यकालात मंत्रीमंडळ विस्तार होणारच नाही, अशा प्रकारचं सूचक विधान बच्चू कडू यांनी केलं. आपण जेव्हा सत्ताधारी पक्षातील आमदारांशी बोलत असतो, तेव्हा २०२४ नंतरच मंत्रीमंडळ विस्तार होईल, असं सांगत असतो, असंही बच्चू कडू म्हणाले. ते वृत्तवाहिनीशी बोलत होते.दिव्यांग मंत्रालयाचं मंत्रीपद तुमच्याकडे कधी येणार आहे? असं विचारलं असता बच्चू कडू म्हणाले, “मला वाटतं, हा प्रश्न तुम्ही एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीसांना विचारायला हवा.**

# ब्राझिलमध्ये सत्तांतरानंतर राष्ट्रपती भवनावर हल्ला

## जेअर बोल्सोनारो यांच्या समर्थकांनी राष्ट्रपती भवनात घातला धूडगूस

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।



श्रीलंकेत सरकारच्या विरोधातील उद्रेक रस्त्यांवर पाहायला मिळाला होता. नागरिकांनी राष्ट्रपती भवनावर कब्जा केला होता. आता त्याचीच पुनरावृत्ती ब्राझीलमध्ये देखील झाली आहे. ब्राझीलमध्ये सत्तांतर झाल्यानंतर राष्ट्रपती भवनावर हल्ला करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणी 400 जणांना अटक करण्यात आली आहे. माजी राष्ट्राध्यक्ष जेअर बोल्सोनारो यांच्या समर्थकांनी राष्ट्रपती भवनात धूडगूस घातला आहे. त्यामुळे बोल्सोनारो यांच्या 400 समर्थकांना अटक करण्यात आली आहे.

गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात झालेल्या निवडणुकीत लुला डा सिल्व्हा यांची राष्ट्राध्यक्षपदी निवड झाली होती. तर या निवडणुकीत बोल्सोनारो यांचा पराभव झाला होता. तेव्हापासूनच बोल्सोनारो समर्थकांमध्ये असंतोष धुमसत होता आणि अखेर तोच काल रस्त्यावर उतरला. त्यांचा पराभव हा त्यांच्या समर्थकांना मान्य नाहीये. त्यामुळे राष्ट्रपतीपदावर बोल्सोनारो यांना बसवा, अशी त्यांची मागणी होती. परंतु हजारो समर्थकांनी आधी राष्ट्रपती भवनासमोर धरणं आंदोलन सुरु केलं. तसेच ब्राझिलचा राष्ट्रध्वज परिधान करुन सुमारे दहा हजार समर्थक एकवटले आणि सरकारविरोधात घोषणाबाजी सुरु केली.

काही कालावधीत समर्थकांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. यावेळी हेलिकॉप्टरद्वारे आंदोलकांना पांगवण्याचा प्रयत्न सुरु झाला. पण आंदोलक इतके आक्रमक झाले की, त्यांनी सुरक्षा रक्षकांनाच पळवून लावलं आणि अखेर राष्ट्रपती भवनाचा ताबा घेतला. दरम्यान, 12 तास उलटून गेल्यानंतर सुरक्षा यत्रणांना राष्ट्रपती भवनाला आंदोलकांपासून मुक्त करण्यात यश मिळाले. त्याचप्रमाणे आतापर्यंत 400 समर्थकांना अटक करण्यात आली आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्राझीलियातील राज्य संस्थांविरोधात दंगल आणि तोडफोड झाल्याच्या बातम्यांबद्दल चिंता व्यक्त केली आहे. लोकशाही परंपरांचा प्रत्येकाने आदर केला पाहिजे. ब्राझीलच्या अधिकाऱ्यांना आमचा पूर्ण पाठिंबा आहे, असं ट्विट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे.

# जम्मू-काश्मीरमध्ये गावकरीच देणार अतिरेक्यांना सडेतोड उत्तर

## सीआरपीएफकडून प्रशिक्षण

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

गेल्या सात-आठ वर्षांत जम्मू-काश्मीरमधील अतिरेकी कारवायांमध्ये घट झाली आहे. त्यातच अनुच्छेद 370 हटविल्यानंतर परिस्थिती बऱ्यापैकी नियंत्रणात आहे. आता तेथील नागरिकांनाच ‘आत्मनिर्भर’ बनविण्यावर भर देण्यात येणार आहे. सीआरपीएफकडून गावकऱ्यांना सीआरपीएफ शस्त्र चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याने या अतिरेक्यांना गावकरीच सडेतोड उत्तर देतील.

सीआरपीएफ’चे शूरवीर आता ग्रामविकास समितीच्या (व्हीडीसी) माध्यमातून गावकऱ्यांना शस्त्रे कशी वापरायची, हे शिकवणार आहेत. राज्यातील अनेक ग्रामीण भागात लोकांकडे आधीच परवानाधारक शस्त्रे आहेत. पुंछ-राजौरीमध्ये झालेल्या मोठ्या अतिरेकी हल्ल्यांनंतर आता जम्मू-काश्मीरच्या सर्व भागात ही योजना राबविण्याची रणनीती तयार करण्यात आली आहे. सीआरपीएफकडून गावातच हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. कुठे आणि किती लोकांना प्रशिक्षण दिले जाईल, त्याचा तपशील तयार केला जात आहे. जम्मू-काश्मीरच्या राजौरी सेक्टरमधील धनगरी गावात नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी मोठा दहशतवादी हल्ला झाला. त्यात चार जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. दुसऱ्याच दिवशी आयईडी स्फोटात दोन जणांना आपला जीव गमवावा लागला. याशिवाय नऊ जण जखमी झाले. यानंतर केंद्रीय गृह मंत्रालय, गुप्तचर यंत्रणा आणि जम्मू-काश्मीर प्रशासनाने ग्रामस्थांच्या सुरक्षेसाठी अनेक उपाययोजना करण्यास सुरुवात केली.



# 26 जानेवारीला 'पिकोलो' सर्वत्र होणार प्रदर्शित

मराठी चित्रपटांमधून नावीन्यपूर्ण विषयांची निवड जाणीवपूर्वक होऊ लागली आहे. प्रेक्षकही त्याकडे मोठ्या प्रमाणात आकर्षित होताना दिसताहेत. हीच बाब ध्यानात घेऊन फोर्टिगो मोशन पिक्चर प्रा.लि प्रस्तुत आणि अभिजीत मोहन वारंग दिग्दर्शित 'पिकोलो' या मराठी चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. येत्या २६ जानेवारीला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. राजेश मुद्दापूर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे.

आजच्या पिढीसमोर असणारे प्रश्न, त्यांना पेलावी लागणारी आव्हानं या साऱ्याचं चित्रण करत नातेसंबंधांचे सूक्ष्म पदर संगीताच्या माध्यमातून अलगदपणे उलगडून सांगणारा 'पिकोलो' हा संगीतमय चित्रपट आहे. या चित्रपटाचे पोस्टर नुकतेच श्री क्षेत्र शिर्डी येथे साईबाबांच्या चरणी अर्पण करण्यात आले. प्रत्येकालाच आयुष्यात काही ठोस असे ईप्सित साध्य करायचे असते त्यात अनेक अडथळे येतात, त्यावर मात करून पुढे जायचे असते. या चित्रपटातही हा संघर्ष आहे. या चित्रपटात मध्यवर्ती भूमिकेत असलेले प्रेमीयुगुल जगण्याच्या




संघर्षावर संगीताची फुंकर घालून त्यातून कसा मार्ग काढतात? हे 'पिकोलो' चित्रपटात पाहणं रंजक ठरणार आहे. प्रणव रावराणे आणि अश्विनी कासार यांची मध्यवर्ती भूमिका या चित्रपटात आहे.या दोघांसोबत 'पिकोलो' चित्रपटात किशोर चौघुले, अभय खडपकर, दीक्षा पुरळकर, नमिता गावकर, पद्मा वेंगुर्लेकर, विश्वजीत पालव, मिलिंद गुरव, हर्षद जाधव, रघु जगताप, रोहन जाधव, हर्षद राऊळ, शुभम सुतार, हर्षद परब, विद्याधर कार्लेकर आदी कलाकारांच्या भूमिका आहेत. चित्रपटाची कथा प्रमोद शेलार यांची आहे. छायाचित्रण कार्तिक परमार तर संकलन पराग सावंत यांचे आहे. संगीत आणि ध्वनीरचना आनंद लुंकड यांची असून कलादिग्दर्शनाची जबाबदारी नरेंद्र भगत यांनी सांभाळली आहे. असोशिएट प्रोड्युसर सागर म्हात्रे तर कार्यकारी निर्मिते राजू आर के झेंडे आहेत.

# 'मिस्ट्री मॅन 'च्या प्रेमात पडली स्वरा भास्कर!



स्वरा भास्कर कोणत्या ना कोणत्या कारणाने प्रसिद्धीच्या झोतात राहते. कधी ती तिच्या राजकीय विचारांमुळे तर कधी वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत असते, मात्र यावेळी ती तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. स्वराने इंस्टाग्रामवर मिस्ट्री मॅनसोबतचा तिचा एक क्यूट फोटो शेअर केला आहे. या फोटोमध्ये स्वरा आणि मिस्ट्री मॅन एकमेकांचे लाड करताना दिसत आहेत. त्या व्यक्तीचा चेहरा दिसत नाही. स्वराने या फोटोसोबत लिहिलेल्या कॅप्शननंतर चाहते तिला तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सतत प्रश्न विचारत आहेत. अभिनेत्रीने या फोटोला कॅप्शन दिले आहे, 'ये प्यार हो सक्ता है.' आता स्वराच्या या फोटोने लोकांना तिच्या लव्ह लाईफबद्दल विचार करायला लावला आहे. यासोबत स्वराने ब्लॅक हार्ट इमोजी पोस्ट केला आहे. मात्र, यामध्ये स्वराचा चेहरा दिसत नाही आणि ती कोणासोबत आहे हेही कळू शकलेले नाही. या पोस्टसोबत स्वरा भास्करने कॅप्शन दिल्यानंतर लोकांनी तिचे अभिनंदन करण्यास सुरुवात केली आहे. मिस्ट्री मॅनसोबतचा स्वराचा हा क्यूट फोटो व्हायरल होत आहे. चाहते आता त्याच गोष्टीची वाट पाहत आहेत, स्वरा लवकरच मिस्ट्री मॅनचे नाव उघड करेल. आम्ही तुम्हाला सांगतो की स्वरा लेखक हिमांशू शर्मासोबत रिलेशनशिपमध्ये होती, 2019 मध्ये त्यांचे ब्रेकअप झाले होते.

# शकुंतला बनून समंथाने लुटली



यशोदा नंतर, समंथा रुथ प्रभू पुन्हा एकदा पडद्यावर तिच्या नवीन अवतारासह चाहत्यांना भुरळ घालण्यासाठी सज्ज झाली आहे. ती बऱ्याच दिवसांपासून तिच्या 'शाकुंतलम' चित्रपटामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वी तिच्या 'शाकुंतलम' या पौराणिक चित्रपटाची नवीन रिलीज डेट समोर आली होती. त्यानंतर आता तिच्या मोस्ट अवेटेड चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांसमोर आला आहे. समंथा रुथ प्रभूचा हा तेलगू चित्रपट संपूर्ण भारतात प्रदर्शित होणार आहे. हा चित्रपट हिंदीतही प्रदर्शित करण्याचा निर्णय निर्मात्यांनी घेतला आहे. हिंदीत नुकताच प्रदर्शित झालेल्या या छोट्या ट्रेलरने चाहत्यांची आणि प्रेक्षकांची उत्सुकता द्विगुणित केली आहे. हा 2 मिनिट 52 सेकंदाचा हिंदी ट्रेलर अगदीच अप्रतिम आहे. ट्रेलरची सुरुवात छोट्या शकुंतलाच्या जन्मापासून होते, जिला तिचा जन्म होताच तिच्या पालकांनी सोडून दिले होते. तिचा जन्म ऋषी विश्वामित्र आणि स्वर्गातील अप्सरा मेनका यांच्या प्रेमसंबंधातून झाला आहे. शकुंतला अनाथ दिसल्यावर ऋषी कण्व तिची काळजी घेतात. एके दिवशी राजा दुष्यंत त्याच्या साथीदारांपासून विभक्त होऊन जंगलात जातो आणि तिथे त्याला शकुंतला दिसते आणि दोघांमध्ये प्रेमसंबंध सुरू होतात. त्यानंतर दोघेही जंगलातच लग्न करतात. त्यांचे प्रेम वाढत जाते आणि राजा दुष्यंत शकुंतलाला वचन देतो की तो नक्कीच परत येईल. दरम्यान, शकुंतलालाही तिची आई ज्या प्रसंगातून गेली होती अशाच प्रसंगातून तिला जावे लागले हे ट्रेलरमध्ये दाखवण्यात आले आहे.

# इतके दिवसं कुठं होतीस! सलमानच्या चाहत्यांनी सोमी अलीला झाडलं





अभिनेत्री सोमी अली गेल्या अनेक दिवसांपासून तिच्या इंस्टाग्राम पोस्टमध्ये बॉलिवूड स्टार सलमान खानसोबतच्या तिच्या नात्याबद्दल खुलासा करत आहे. सोमी अलीने पुन्हा एकदा सलमान खानच्या विरोधात अनेक आरोप केले आहेत. या पोस्टच्या माध्यमातून सोमी अलीने सलमान खानवर अनेक गंभीर आरोपपण केले आहेत. सलमान खान विरोधात केलेल्या पोस्टमुळे अभिनेत्रीला खूप ट्रोल केले जात आहे. ती आणि सलमान डेट करत असताना काय घडले या प्रश्नाचे उत्तर देताना तिने लिहिले की ती तिच्या आयुष्यातील सर्वात वाईट वर्षे होती. तो सतत तिला मारहाण करत असे, सलमान ने वर्षानुवर्षे तिला त्याची गर्लफ्रेंड म्हणून सार्वजनिकपणे स्वीकारले नाही आणि शेवटी जेव्हा त्याने असे केले तेव्हा तो त्याच्या मित्रांसमोर तिचा अपमान करेल आणि तिला नॉनस्टॉप मारले असं तिने लिहिले.

# अभिनयच्या प्रेमाचं पुस्तक उघडण्यापूर्वीच बंद होताना दिसतेय...

जर तुम्ही खऱ्या प्रेमाच्या शोधात असाल आणि प्रेमाच्या सायन्सचे नियम पाळले नाहीत तर कधी ना कधी प्रेमात तुमचे बांबू लागणार. काही दिवसांपूर्वी 'बांबू' या चित्रपटाचा टिझर प्रेक्षकांच्या भेटीस आला होता. तेव्हापासूनच प्रेमात बांबू लागलेला प्रत्येक जण हा चित्रपट पाहण्यासाठी आतुर झाला आहे. या चित्रपटातील 'मी तुला त्या नजरेने' हे धमाल गाणे प्रदर्शित झाले असून हे गाणे रोहित राऊत आणि ज्ञानदा पवारने गायले आहे. तर सचिन पाठक यांनी शब्दबद्ध केलेल्या या गाण्याला समीर सप्तीसकर यांनी संगीत दिले आहे. या गाण्यात अभिनय बेर्डेच्या आयुष्यात अनेक मुली येताना दिसत असल्या तरी त्याचे खरं प्रेम त्याला मिळत नाहीये. प्रत्येक मुलगी त्याच्याकडे केवळ एका चांगल्या मित्राच्या भावनेने पाहात असल्याने प्रत्येकवेळी अभिनयच्या प्रेमाचं पुस्तक उघडण्यापूर्वीच बंद होताना दिसतेय. प्रत्येक मुलगी त्याला एकच वाक्य बोलतेय 'मी तुला त्या नजरेने कधी पाहिलं नाही'. आता त्याची ही शोधमोहीम पूर्ण होऊन त्याला खरं प्रेम मिळणार का, हे आपल्याला २६ जानेवारीला चित्रपट प्रदर्शित झाल्यावरच समजेल.

गाण्याबद्दल दिग्दर्शक विशाल देवरुखकर म्हणतात, "हे एक जबरदस्त गाणे असून तरूणाईला



# अभिजित कटके ‘हिंदकेसरी’!



## » महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब : कुस्तीक्षेत्रात आनंदोत्सव

**। मुंबई । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

महाराष्ट्र केसरी ठरलेल्या पैलवान अभिजीत कटके याने हिंदकेसरी कीताब पटकावलाय. हैद्राबाद येथे झालेल्या हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेत अभिजीत कटकेने खुल्या गटातून हा मान मिळालाय. अंतिम फेरीत अभिजीने हरियाणाच्या सोमवीरचा 5-0 असा पराभव केलाय. भारतीय शैली कुस्ती महासंघाच्या वतीनं हिंदकेसरी कुस्तीचं आयोजन करण्यात आलं होतं. अभिजीने पटकावलेला हिंदकेसरीचा किताब म्हणजे महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी आणि तितकीच अभिमानाची बाब आहे.

अभिजीत कटके याच्या विजयानंतर संपूर्ण महाराष्ट्रात जल्लोष साजरा केला जातोय. अभिजीत मुळचा पुण्याचा असल्याने पुण्यात देखील फटाके फोडून जल्लोष साजरा केला जातोय. भारतीय कुस्तीतील सर्वात मानाची स्पर्धा म्हणजे हिंद केसरी. या हिंद केसरी सामन्याचा अंतिम सामना काल खेळला गेला.

प्रतिस्पर्धी पैलवानाला एकही गुण मिळू दिला नाही

### दोन वेळा उपमहाराष्ट्र केसरी ...

**» अभिजीत याने या पूर्वी दोन वेळा उपमहाराष्ट्र केसरी तर एकवेळा महाराष्ट्र केसरी किताब पटकावला आहे. त्यानंतर त्याने हिंद केसरीची मानाची गदा पटकावून महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवलाय.**

पहिल्या फेरीत चार गुणांची आघाडी घेतलेल्या अभिजीतने सोमवीरला आक्रमणाची संधीच मिळून दिली नाही. दुसऱ्या फेरीत देखील नकारात्मक कुस्ती करीत असल्याने पंचांनी सूचना देऊन तीस सेकंदात गुण घेण्याची सूचना दिली. मात्र तीस सेकंदात तो अभिजीतचा भक्कम बचाव भेदण्यात अयशस्वी ठरल्याने पंचांनी अभिजीतला एक गुण दिला. शेवटच्या मिनिटांत सोमवीर आक्रमक झाला. परंतु, अभिजित त्याला एकही गुण मिळू न देता हिंदकेसरीची गदा पटकावली.

> “२००१७ सालच्या कुस्ती स्पर्धेत मला हार पत्करावी लागली होती. त्यानंतर सलग चार वर्षे मेहनत करून मी हा किताब पटकावला आहे. माझ्या प्रशिक्षकांनी सांगितली तशी मी कुस्ती केली, या विजयाने मला खूप आनंद झालाय. हैदराबादहून पुण्यात पोहोचल्यानंतर तेथे या विजयाचा आनंद साजरा केला जाणार आहे.
>
> **- अभिजित कटके, हिंदकेसरी.**

### अभिजीत मुळचा पुण्याचा..

**» अभिजीत पुण्यातील शिवरामदादा तालीम येथे सराव करतो. या विजयाने अभिजीत याने महाराष्ट्र केसरी आणि हिंदकेसरी, रुस्तम ए हिंद दोन्ही किताब मिळवणाऱ्या दिनानाथ सिंह, दादुमामा चौगुले, हरिश्चंद्र बिराजदार, विनोद चौगुले आणि अमोल बुचडे यांच्या पंक्तीत विराजमान होण्याचा बहुमान अभिजीतने पटकावला आहे.**

---

# भारताला मोठा धक्का!

## » सहा वेळची चॅम्पियन मेरी कोमची वर्ल्ड बॉक्सिंग चॅम्पियनशिपमधून माघार

**।पुणे। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

सहा वेळा विश्वविजेती महिला बॉक्सर मेरी कोमने दुखापतीमुळे यंदाच्या बॉक्सिंग महिला विश्व चॅम्पियनशिपमध्ये खेळणार नसल्याचे जाहीर केले आहे. जागतिक चॅम्पियनशिपमध्ये एकूण आठ पदके जिंकणाऱ्या ४० वर्षीय मेरीने दुखापतीच्या स्वरूपाबाबत स्पष्टीकरण दिले नाही परंतु ती लवकर बरी होण्याची आशा करत असल्याचे तिच्या प्रशिकाकडून सांगितले जात आहे.

आईबीए (IBA) वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धा यावर्षी १ ते १५ मे दरम्यान ताश्कंद, उझबेकिस्तान येथे होणार आहे. मेरी कोम म्हणाली, “दुखापतीमुळे मी आईबीए महिला



वर्ल्ड चॅम्पियनशिप २०२३ मध्ये सहभागी होऊ शकणार नाही. मी लवकर बरा होण्याचा प्रयत्न करत आहे. मला आशा आहे की या चॅम्पियनशिपमधून आम्हाला आणखी चॅम्पियन्स मिळतील. मी सर्व सहभागींना शुभेच्छा देते.”गुडघ्याच्या दुखापतीमुळे निवड चाचणीतून माघार घ्यावी लागल्याने मेरी कोमला गेल्या वर्षी बर्मिंगहॅम राष्ट्रकुल स्पर्धेतून माघार घ्यावी लागली होती. ४८ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीच्या पहिल्या फेरीत सुरुवातीच्या काही मिनिटांत त्याचा डावा गुडघा वळला होता. चढाईच्या पहिल्याच फेरीत मेरी कोम पंच टाळण्याच्या प्रयत्नात कॅनव्हासवर पडली.सर्व काळातील महान भारतीय खेळाडूंपैकी एक, मेरी कोम ही जागतिक चॅम्पियनशिपच्या इतिहासातील सर्वात यशस्वी बॉक्सर आहे. पहिल्या सात जागतिक चॅम्पियनशिपमध्ये पदक जिंकणारी ती एकमेव महिला बॉक्सर आहे. आठ जागतिक चॅम्पियनशिप पदके जिंकणारी एकमेव बॉक्सर (पुरुष किंवा महिला) आहे. दक्षिण कोरियाच्या इंचॉन येथे २०१४ च्या आशियाई खेळांमध्ये सुवर्ण जिंकणारी मेरी पहिली भारतीय महिला बॉक्सर आणि २०१८ राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत सुवर्ण जिंकणारी पहिली भारतीय महिला बॉक्सर ठरली.

### चाहते झाले नाराज

सहा वेळा विश्वविजेती महिला बॉक्सर मेरी कोमच्या घोषणेने क्रीडाप्रेमींची निराशा झाली आहे. जागतिक चॅम्पियनशिपमध्ये एकूण आठ पदके जिंकणाऱ्या या ४० वर्षीय तरुणीने या क्षणी दुखापतीबद्दल आणि तिला कोणत्या प्रकारची दुखापत झाली आहे याबद्दल कोणतीही माहिती दिली नाही.

# बाबुराव चांदेरे सोशल फाऊंडेशन, शिवशक्ती संघांना जेतेपद



**।मुंबई। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

बंडय़ा मारुती सेवा मंडळातर्फे आयोजित केलेल्या राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत नांदेडच्या बाबुराव चांदेरे फाऊंडेशन पुरुष गटात, तर मुंबई शहरच्या शिवशक्ती संघाने महिला गटात विजेतेपद पटकाविले. स्वस्तिकचा आकाश रूडले पुरुषांत स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. तर, शिवशक्तीची अपेक्षा टाकळे महिलांत स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरली.

ना. म. जोशी मार्ग येथील श्रमिक जिमखाना येथे संपन्न झालेल्या पुरुषांच्या अंतिम सामन्यात बाबुराव चांदेरे सोशल फाऊंडेशनने उपनगरच्या स्वस्तिक मंडळाचा प्रतिकार ३५-१९ असा सहज मोडून काढत जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. बाबुराव चांदेरे सोशल फाऊंडेशन संघाने आक्रमक सुरुवात करीत पहिल्या काही मिनिटांतच स्वस्तिकवर लोण देत १०-०१ अशी आघाडी घेतली. पण, स्वस्तिकने देखील त्यानंतर जशास तसे उत्तर देत हा लोण फेडत ही आघाडी ११-१२ अशी कमी केली. मध्यंतराला १५-१३ अशी फाऊंडेशनकडे आघाडी होती. दुसऱ्या डावात बाबुराव चांदेरे सोशल फाऊंडेशनने आपला खेळ अधिक गतिमान करीत आणखी दोन लोण स्वस्तिकवर चढविले. दुसऱ्या डावात बाबुराव चांदेरे सोशल फाऊंडेशनने २३ गुणांची कमाई केली तर, स्वस्तिकला अवघे सहा गुण मिळविता आले.